**THE BISHOP'S CO-ED SCHOOL, UNDRI**

# घर घर झेंडा उपक्रम अहवाल

भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त भारत सरकारतर्फे 'घर घर झेंडा अभियान' या उपक्रमामध्ये दिनांक १० ऑगस्ट २०२२ या दिवशी आपल्या शाळेचा सहभाग होता.

कार्यक्रमाच्या सुरवातीला द बिशप्स को-एड स्कूलचे प्राचार्य श्री. लुक सर, मुख्याध्यापक श्री. रसल सर तसेच कोंढवा पोलीस स्टेशनचे श्री. मोगले साहेब व श्री मोहिते साहेब आणि पोलीस बँड पथक यांचे स्वागत करण्यात आले. आपल्या शाळेमध्ये हा कार्यक्रम कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर यांच्यातर्फे बँडच्या पथकासह सादर करण्यात आला.

१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधी मध्ये 'घर घर झेंडा अभियान, हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी सरकारतर्फे ध्वजसंहिता सुद्धा देण्यात आली आहे. प्रत्येक नागरिकाने याचे पालन करावे. आपल्या जवळील झेंडा सन्मानाने व सुरक्षित ठेवावा. नंतर झेंडा फेकला जाऊ नये. राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे.

श्री. रसल सरांच्या मार्गदर्शना खाली तसेच सौ. खंडेलवाल व श्री. मार्क फर्नांडीस यांच्या मदतीने हा कार्यक्रम पार पडला. इयत्ता ६ वी ते ८ वी चे विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. सर्व मराठी शिक्षिका व इतरही अनेक शिक्षक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ. सायली कात्रे यांनी केले.

## 'घर घर तिरंगा अभियान': झेंडा फडकविण्याचे नियम.




## मुख्याध्यापक श्री. रसल सर पोलिस अधिकाऱ्यांसोबत.





## पोलिस बँड पथक सादरीकरण करताना.





**प्रास्ताविक व आभार प्रदर्शन करताना सौ. सायली कात्रे.**



**इयत्ता ६ वी, ७ वी आणि ८ वी चे उत्साही विद्यार्थी.**







अहवाल लेखन : सौ. सायली कात्रे. (मराठी शिक्षिका)

